MHJN070009872024

आर.सी.एस. क्र. १४६/२०२४
शिवाणी वि. गणेश व ई.

**नि.क्र.२१ वरील आदेश.**

प्रतिवादी क्र. १ यांनी प्रस्तुतचा अर्ज हा प्रकरणामध्ये त्यांचेविरुध्द ''लेखी म्हणणे नाही''चा झालेला आदेश रद्द लेखी से व जबाब स्वीकारणे बाबत दाखल केलेला आहे.

**२.** प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी हे मागील तारखेस बाहेरगावी असल्याने प्रकरणात हजर राहून लेखी जबाब दाखल करू शकले नाही. त्यामुळे प्रतिवादी विरूध्द लेखी जबाब नाही चा आदेश पारीत करण्यात आला आहे. दावा गुणवत्तेवर निकाली काढण्याकरिता त्यांचे म्हणणे रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.१ यांचे लेखी म्हणणे रेकॉर्डवर घेउन त्यांना सदर दाव्यामध्ये त्यांची बाजु मांडण्याची संधी न मिळाल्यास त्यांचे खूप मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. सबब, अर्ज मंजुर करण्याची विनंती त्यांनी केली आहे.

**३.** वादीच्या विधीज्ञांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र. १ यांना दिनांक २४/०९/२०२५ रोजी समन्स प्राप्त झाले. त्यांना पुरेशी संधी देवून देखीलही त्यांनी जाणीवपूर्वक विहीत मुदतीत जबाब दाखल केला नाही. करीता, सदर अर्ज नामंजुर करण्याची विनंती त्यांनी केली.

**४.** अर्ज वाचला. म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादींतर्फे विव्दान वकिलांना ऐकले.

**५.** दावा हा शाश्वत मनाई हुकूम मिळणे बाबत न्यायालयात दाखल केला आहे. तसेच प्रस्तुत प्रतिवादी हे दाव्याकामी आवश्यक पक्षकार आहेत. नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टीने सदरचा दावा हा गुणदोषावर निकाली निघण्याकरीता प्रतिवादी क्र. १ यांची कैफियत येणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांना अर्ज नामंजुर केल्यास त्यांचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांचा अर्ज मंजुर करणे गरजेचे आहे. परंतु प्रतिवादी क्र. १ यांनी केलेल्या विलंबा बाबत त्यांना आर्थिक दंड करणे देखील तितकेच महत्वाचे आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

**१.** अर्ज रक्कम रुपये ७००/- च्या खर्चावर मंजूर करण्यात आला.

**२.** प्रतिवादी क्र. १ यांनी सदरचा खर्च वादी यांना पुढील नेमले तारखेस किंवा त्यापुर्वी देणेचा आहे.

दि.१९.०८.२०२६

(श्री. जी.एन.लंघे )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
जाफ्राबाद.